जा. क्र. माध्य. ३[१४]/नुतनीकरण/मान्यता/पुणे
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 19 AUG 1995

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्य.],
जिल्हा परिषद, पुणे.

**विषय** :- १९९४-९५ या वर्षी परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळेच्या आदेशाचे १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून नुतनीकरण करण्याबाबत....

**संदर्भ** :- शासन पत्र क्रमांक एसएसएन-१०९४/५५२५/माशि-१, दिनांक २९/७/९५.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय शासन आदेशान्वये कळविण्यात येते की, मित्रमंडळ एज्युकेशन सोसायटी, पर्वती पुणे - ९ या संस्थेस मित्रमंडळ कॉलनी पुणे-९ या ठिकाणी नवीन माध्यमिक शाळा सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास शासन पत्र क्र. एसएसएन-१०९४/५११५/माशि-१, दिनांक १५/१०/९४ अन्वये परवानगी देण्यात आलेली होती. तथापि परवानगी आदेश उशिरा मिळाल्याने विद्यार्थी संख्ये अभावी त्या वर्षी संस्थेस शाळा सुरु करता आली नाही.

याबाबत संस्थेने केलेली विनंती विचारात घेऊन सदर संस्थेस सन १९९४-९५ या वर्षी माध्यमिक शाळा सुरु करण्यास दिलेल्या परवानगी आदेशाचे नूतनीकरण करुन " जून १९९४ " ऐवजी " जून १९९५ " पासून त्याच ठिकाणी शाळा सुरु करण्यास संदर्भिय आदेशान्वये शासनाने परवानगी दिली आहे. सदर परवानगी शासन पत्र दिनांक १५/१०/९४ च्या पत्रात नमूद केलेल्या विहित अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

याबाबत पुढील कार्यवाही करुन संबंधित संस्थेस तात्काळ कळविण्यात यावे.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत : सचिव,
मित्र मंडळ, एज्युकेशन सोसायटी,
मित्र मंडळ कॉलनी, पर्वती, पुणे - ९.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/ब-४/नै.वाढ/९६
पुणे, दि. ७।२।९७

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

सौ. सुंदरदेवी राठी हायस्कूल, मित्रमंडळ
पुणे ९

**विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.**

सन १९९६-९७, इ. ६ वी, ७वी, ९वी, १०वी.

आपल्या मित्रमंडळ एज्यु. सोसायटी, पुणे ९ व्दारा संचलित सौ. सुंदरदेवी राठी हाय. मित्रमंडळ ह्या माध्यमिक शाळेतील इ. ८वी/५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९५ - ९६ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य अनुदानीकरण पुवि/९५ . दि. ऑगस्ट ९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९६ - ९७ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, ७ वी, ९ वी, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची --- वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक) ९५३६
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-८/नै.वाढ/ ५७
पुणे, दि. १५।६।९७

प्रति,

BOOK-POST



मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~सौ. सुंदरदेवी राठी हायस्कूल, मित्रमंडळ,~~
~~पुणे ९~~

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. सन ९७-९८

इ. ~~६ वी~~, इ. ~~७~~ वी, ~~इ. ९~~ वी, इ. १० वी.

आपल्या मित्रमंडळ एज्यु. सोसायटी, पुणे ९ द्वारा संचलित ~~सौ. सुंदरदेवी राठी हाय. मित्रमंडळ~~ माध्यमिक शाळेतील इ.८ वी/ ~~इ. ५~~ वी चे वर्गास (माध्यम मराठी/~~इंग्रजी~~) सन १९९ - ९ या शै. वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य/३(१४)/नमाशा/मान्यता/पुवि/ ९५ दि. २८।७।९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन ९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७~~ वी, ~~इ. ९~~ वी, इ.१० वी चा वर्ग ---- नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी जि.प.पुणे / गट ~~शिक्षणाधिकारी, पं.स.~~ यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेऊन तपासणी अहवाल या कार्यालयाकडे त्वरित सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे सादर करणेबाबत संपर्क साधावा.

१९७

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.